Synopsis

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पी.एचडी. पदवी साठी सादर करावयाचा संशोधन शोध प्रबंध ची रूपरेषा

विद्याशाखा- वाणिज्य

संशोधन विषय :-

"लातूर जिल्हयाच्या आर्थिक विकासामध्ये नागरी सहकारी बँकांची भूमिका. विशेष संदर्भ - महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर."

(2011-12 ते 2020-21)

संशोधक -

श्री सय्यद फारुखअली जहूरअली

(एम.कॉम.,बी.एड.,एम.ए.अर्थशास्त्र)

महात्मा गांधी महाविद्यालय,अहमदपूर

संशोधन मार्गदर्शक -

डॉ. धालगडे अरुण बळीराम

(एम.कॉम.,एम.फिल.,पी.एचडी.)

विभाग प्रमुख, वाणिज्य विभाग,

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा. जिल्हा लातूर.

संशोधन केंद्र:

शिवाजी महाविद्यालय,रेणापूर .जिल्हा- लातूर.

<u>प्रस्तावना:</u>

प्राचीन काळापासून सहकार हा मानवी संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. मानवाच्या शिकारी अवस्थेपासून आजच्या प्रगत अवस्थेपर्यंतचा विचार केला तर असे आढळते की, एकत्रितपणे विचार करणे व काम करणे ही मानवाची सहज आणि नैसर्गिक प्रवृत्ती आहे. त्यातून त्याला सुखी आयुष्य जगण्याची प्रेरणा मिळते मानवाच्या जीवन प्रणालीचा इतिहास हा सहकाराचा इतिहास आहे त्यामुळे आधुनिक अर्थव्यवस्थेत सहकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे कौटुंबिक व सामाजिक जीवनात एकत्रित राहणे व काम करणे. सहकार आणि मानवी जीवन यांचा जवळचा संबंध आहे सहकारामध्ये व्यक्तींनी एकत्रित राहण्याबरोबरच एकमेकांना मदत करण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचा ही समावेश होतो. सर्वांनी मिळून एकमेकांच्या मदतीने सर्वांच्या हितासाठी एकत्रित काम करणे याला सहकारात विशेष महत्त्व आहे. सहकार हा व्यवसाय संघटनेचा एक प्रकार आहे सहकारी संस्थेचे संघटन हे इतर व्यावसायिक संघटन प्रकारापेक्षा वेगळे आहे इतर व्यवसाय संघटना या नफ्याच्या हेतूने स्थापन झालेल्या असतात परंतु सहकारामध्ये नफा मिळवणे हे गौण मानले जाते आणि सेवेला प्राधान्य दिले जाते. सहकारात भांडवलापेक्षा व्यक्तीला महत्त्वाचे स्थान आहे.

भारतात ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सहकार चळवळ सुरू झाली परंतु शहरी व निमशहरी भागातील मध्यमवर्गीय जनतेसाठी ही सहकारी संस्थांची गरज वाटू लागली. ग्रामीण भागात ज्या प्रमाणे शेतकऱ्यांना शेती उत्पादन व शेती विकास यासाठी अल्पकालीन व मध्यम कालीन कर्ज पुरवठ्याची गरज असते त्याच प्रमाणे नागरी भागातील लहान व मध्यम वर्ग छोटे व्यापारी ,लहान व्यावसायिक, लघुउद्योजक, छोटे तंत्रज्ञ, कारागीर ,पगारदार नोकर वर्ग यांना देखील योग्य प्रकारच्या कर्जपुरवठ्याची आवश्यकता असते. या

सामाजिक वर्गाला कर्जपुरवठा करुन त्यांची सावकारांच्या पाशातून मुक्तता करण्यासाठी ,त्यांना वैयक्तिक तारणावर कर्ज पुरवठा करण्यासाठी, बचतीची व काटकसरीची सवय लावण्यासाठी नागरी सहकारी बँकांचा उदय झाला.

“ज्या प्राथमिक सहकारी बँका शहरी व निमशहरी भागात स्थापन झालेल्या आहेत त्यांना नागरी सहकारी बँका असे म्हणतात.”

भारतात पहिली नागरी सहकारी बँक ही **5 फेब्रुवारी 1989** मध्ये मुंबई प्रांतातील बडोदा या शहरात श्री विठ्ठल लक्ष्मण कवठेकर तथा भाऊसाहेब कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झाली या संस्थेचे नाव 'अन्योन्य   सहाय्यकारी मंडळी' असे होते

अहमदपूर शहर व लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी दिनांक **3 ऑगस्ट 1994** रोजी महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर या बँकेची स्थापना झाली

<u>ब) अभ्यासाची गरज /महत्व-/ विषय निवडीचे कारणे:</u>

शहरी व निमशहरी भागातील जनतेच्या आर्थिक गरजा पूर्ण करून त्यांना बँकिंग सुविधा पुरविणे या उद्देशाने नागरी सहकारी बँकेची स्थापना झालेली असते. नागरी सहकारी बँकांनी शहरी भागातील जनतेच्या मनात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. सुलभ कार्यपद्धती आणि सभासद व बिगर सभासदांच्या गरजांची विनाविलंब पूर्तता यामुळे या बँकांना शहरी भागामध्ये लोकप्रियता निर्माण झालेली आहे

अशावेळेस महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर या बँकेने आपला एक वेगळा पॅटर्न तयार करून मागील सत्तावीस वर्षापासून लातूर जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शहरी व निमशहरी भागातील जनतेच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी केलेल्या कर्ज

वसुलीची पद्धती ,पतपुरवठा याचे निकष, अनुत्पादित कर्जाचे वितरण या प्रकारची सर्व माहिती घेऊन सहकार क्षेत्राला एक वेगळी दिशा देऊन त्याच प्रकारचे प्रयत्न महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँकेमध्ये व्हावेत व सहकार चळवळ प्रध्दींगत होईल ,शेतकऱ्यांच्या शेवटच्या घटकापर्यंत त्याचे फायदे पोहोचावेत व शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात त्यासाठी हे प्रयत्न .बँकेची सर्वांगीण उन्नती साध्य व्हावी तिला स्थैर्य व समृद्धी लाभावी यासाठी संचालक मंडळ योग्य पद्धतीचे नियोजन करत असून ते अवलंबत आहेत.

<u>संशोधनाची उद्दिष्टे</u>:

1) नागरी सहकारी बँकांचे लातूर जिल्ह्यातील आर्थिक विकासातील योगदान अभ्यासणे.
2) लातूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची कार्यपद्धती अभ्यासणे.
3) लातूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीतील समस्या अभ्यासणे व उपाय योजना सुचविणे.
4) महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने केलेल्या कर्ज पुरवठ्याबाबत सविस्तर माहिती मिळवणे.
5) महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या उत्कृष्ट कर्ज वसुली प्रमाणाची कारणे शोधणे.
6) महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाची कारणे शोधणे.

7) महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने विविध बचत गटासाठी केलेल्या कार्याची माहिती घेणे.

ड) संशोधनाचे महत्त्व

1) नागरी सहकारी बँकेच्या संदर्भातील संशोधन शहरी व निमशहरी भागातील कामगार, कारागीर, लहान व्यापारी, पगारदार, नोकर वर्ग यांच्या आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरेल आणि आर्थिक योगदान वाढेल

2) नागरी सहकारी बँकेच्या संदर्भातील हे संशोधन शहरी भागातील जनतेची सावकारांच्या पाशातून मुक्तता करण्यासाठी, त्यांना वैयक्तिक तारणावर कर्ज पुरवठा करण्यासाठी ,बचतीची व काटकसरीची सवय लावण्यासाठी उपयुक्त ठरेल

3) नागरी सहकारी बँकांचे आर्थिक विकासातील योगदान या विषयाच्या संदर्भात भविष्यकाळात हे संशोधन अध्ययन उपयुक्त ठरतील व मार्गदर्शक ठरेल

इ) गृहीतके:

1) नागरी सहकारी बँकेच्या कर्ज पुरवठा मुळे कामगार, कारागीर, लहान व्यापारी, पगारदार, नोकर वर्ग यांना आर्थिक व सामाजिक न्याय मिळतो.
2) कामगार ,व्यापारी, पगारदार यांच्या उत्पन्नाची पातळी वाढते आणि राहणीमानाचा दर्जा सुधारतो.
3) नागरी सहकारी बँकेने भाग भांडवल व सभासद संख्या सातत्याने वाढ होत आहे.

4) नागरी सहकारी बँकेमध्ये विविध प्रकारच्या ठेवी मध्ये सातत्याने वाढ होत

आहे.

5) नागरी सहकारी बँकेने दिलेल्या कर्जाच्या संख्येत व रकमेत वृद्‌धी झाली आहे.

6) अभ्यास कालावधीत कर्जवसुलीचे प्रमाण वाढत आहे.

7) बँक मागील दहा वर्षापासून नफ्यात आहे.

<u>ई) संशोधन पद्‌धती</u>-

या विषयाच्या संशोधनाचा अभ्यास प्रामुख्याने दोन गटात विभागला आहे

अ) प्राथमिक स्त्रोत

ब) दुय्यम स्त्रोत

<u>अ) प्राथमिक स्त्रोत</u>

प्राथमिक स्त्रोतातील माहिति गोळा करत असताना पुढील प्रकारातून केली जाईल

<u>1) सर्वे पद्‌धती</u>

यामध्ये बँकेचे अधिकारी कर्मचारी सभासद आणि विविध कर्जदार यांना बँकेच्या संदर्भातील विविध प्रश्न विचारण्यात येऊन प्रश्नावली तयार करण्यात येईल

<u>2) मुलाखत पद्‌धती</u>

यामध्ये बँकेचे कर्मचारी कर्जदार सभासद यांची मुलाखत घेऊन त्यांचे बँके बाबतचे मत जाणून घेण्यात येईल

<u>3) निरीक्षण पद्‌धत</u>

अभ्यासादरम्यान बँकेच्या विविध शाखेला भेट देऊन त्यांच्या कार्यपद्धतीचे निरीक्षण करण्यात येईल

ब) दुय्यम स्त्रोत

दुय्यम स्त्रोतातील माहिती ही विविध संशोधन ग्रंथ, शासकिय अहवाल ,नियतकालिके तसेच बँकेचे वार्षिक अहवाल, ऑडिट रिपोर्ट, त्यांनी सांगितलेली तोंडी माहिती इत्यादीतून माहिती गोळा करून अहवाल सादर करण्यात येईल.

अ) संशोधन साहित्याचा आढावा

संशोधक प्रस्तुत संशोधनासाठी योग्य त्या वेळी संशोधन ग्रंथ, अहवाल तसेच नियतकालिके यांचा वापर करणार आहे व आर्थिक विश्लेषणासाठी संशोधक नकाशे, गणितीय व संख्याशास्त्राचा वापर करेल.

ब) संशोधन क्षेत्र व कालावधी

संशोधनाचे कार्य क्षेत्र हे लातूर जिल्हा हा असणार आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी लातूर हा जिल्हा विकासाच्या मार्गावर असल्याने लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये नागरी बँकेचे योगदान पाहण्यासाठी हे क्षेत्र निवडले आहे

प्रस्तुत संशोधनासाठी 2011-12 ते 2020-21 हा कालावधी निवडला आहे.

क) विषय मर्यादा

संशोधनाचा विषय हा व्यापक असला तरी केवळ लातूर जिल्ह्यातील आर्थिक विकासामध्ये नागरी सहकारी बँकांची भूमिका विशेषता महेश अर्बन को-

ऑपरेटिव्ह बँक, अहमदपूर बाबत मर्यादित असून त्यावर संशोधन व अभ्यास केला जाणार आहे.

4) निष्कर्ष व शिफारशी

संशोधनाच्या दृष्टिकोनातून संपूर्ण संशोधन हे माहितीचे आकलन करणे व याची प्राथमिक व दुय्यम स्वरुपात माहिती मिळवून त्याचे पृथक्करण केले जाईल व त्यानंतर निष्कर्ष काढले जाईल आणि शिफारशी सुचविल्या जातील.

5) संशोधन योगदान

नागरी सहकारी बँका कशाप्रकारे कामगार, कारागीर ,लहान व्यापारी, पगारदार, नोकर वर्ग यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करतात आणि महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, अहमदपूर पतपुरवठा व आर्थिक दृष्ट्या विकासाचा कणा बनली आहे संशोधक याचा अभ्यास करणार आहे.

प्रकरणांची रूपरेषा

(2021-22)

1) सहकारी चळवळ व नागरी सहकारी बँकांचा इतिहास:

1.1) प्रस्तावना

1.2) सहकार संकल्पना, अर्थ, तत्वे, महत्व इत्यादी

1.3) जागतिक स्तरावरील व भारतातील सहकारी चळवळ इत्यादी

1.4) नागरी सहकारी बँकांचा इतिहास, महत्त्व, कार्य इत्यादी

1.5) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास

1.6) महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची सद्यस्थिती

2) लातूर जिल्ह्याची ओळख:

2.1) प्रस्तावना

2.2) स्थान व क्षेत्रफळ, हवामान, लोकसंख्या, व्यापार ,सहकारी संस्था इत्यादी

2.3) नागरी सहकारी बँका

3) संशोधन पद्धती व संदर्भ साहित्याचा आढावा

(2022-23)

3.1) प्रस्तावना

3.2) संशोधन अर्थ व व्याख्या

3.3) संशोधनाचा अभ्यास विषय

3.4) संशोधनाची उद्दिष्टे

3.5) संशोधनाची गृहीतके

3.6) संशोधन पद्धती

4) लातूर जिल्ह्याच्या विकासात नागरी सहकारी बँकांची भूमिका:

4.1) प्रस्तावना

4.2) मराठवाड्याच्या विकासात नागरी सहकारी बँकांची भूमिका

4.3) लातूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे योगदान

4.4) शाखानिहाय वित्तीय कामगिरी

4.5) प्रति शाखा ठेवी, कर्ज, उत्पन्न, खर्च इत्यादी

5) लातूर जिल्ह्याच्या विकासात महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. ची भूमिका:

(2023-24)

5.1) प्रस्तावना

5.2) महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची प्रति शाखा निहाय वित्तीय कामगिरी

5.3) लातूर जिल्ह्याच्या विकासात महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची भूमिका

5.4) एकीकृत वित्तीय कामगिरी

5.5) सर्व शाखांची कामगिरी, प्रती सभासद कामगिरी

5.6) प्रती सभासद कामगिरी

6) निष्कर्ष व शिफारशी:

6.1) प्रस्तावना

6.2) गृहित कृत्यांची पडताळणी

6.3) निष्कर्ष

6.4) शिफारशी

<u>संदर्भसूची:</u>

प्रश्नावली

संशोधन मार्गदर्शक -

डॉ. धालगडे अरुण बळीराम

(एम.कॉम.,एम.फिल.,पी.एचडी.)

विभाग प्रमुख, वाणिज्य विभाग,

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा.

जिल्हा लातूर.

संशोधक -

श्री सय्यद फारुखअली जहूरअली

(एम.कॉम.,बी.एड.,एम.ए.अर्थशास्त्र)

संशोधन केंद्र:

शिवाजी महाविद्यालय,रेणापूर .जिल्हा- लातूर.

ठिकाण :

दिनांक :